**दि.चौ.अर्ज क्र. २१३/२०२१**

**नि.क्र. २४/क लगत...**

**<u>अर्जदारतर्फे सा.क्र. १ बळीराम धाऊ पाटील यांचा पुढील उलटतपास गैरअर्जदार यांचे वकिल श्री. एम. एस. थळी यांच्यातर्फे शपथेवर सुरू...</u>**

१३. अर्जदार सीताबाई माझी मावशी आहे. ती जासई येथे राहते. ती आजरोजी आजारी आहे. ती आजारी असल्याची कागदपत्रे प्रकरणात दाखल केलेली नाही. सीताबाई माझ्यापेक्षा अंदाजे ३० वर्षांनी मोठी आहे. हे म्हणणे खरे नाही की, सीताबाईला माहित असलेले तथ्ये मला माहित नाही.

१४. माझी आई कानुबाई ही गव्हाण येथील रहिवासी आहे. गव्हाण हे गाव पनवेल तालुक्यात येते. हे म्हणणे खरे नाही की, जासई पासून गव्हाण हे गाव अंदाजे ३५ ते ४० किमी अंतरावर आहे. माझ्या आईचे लग्न कोणत्या साली झाले, हे मला आठवत नाही. माझ्या आईचे लग्न अंदाजे ६० वर्षापुर्वी झाले आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या आईच्या लग्नापासुन आमचे कुटूंब कोपर गव्हाण या गावी राहते. हे म्हणणे खरे आहे की, माझे शिक्षण व बालपण त्याच गावी झाले. हे म्हणणे खरे आहे की, माझी आई त्याच गावात मयत झाली.

१५. भीमाबाई ही माझ्या आईची आई होती. हे म्हणणे खरे नाही की, भीमाबाईचा सांभाळ रमाबाई हिने केला. हे म्हणणे खरे आहे की, भीमाबाईचा सांभाळ रमाबाई हिने केल्याची कागदपत्रे या प्रकरणात आम्ही दाखल केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, रमाबाई जासई या गावातीलच रहिवासी आहे. हे म्हणणे खरे नाही की, रमाबाईच्या घरापासून भीमाबाईचे घर जवळ होते. हे म्हणणे खरे नाही की, भीमाबाईला मुलगा नसल्याने तिचा सांभाळ, औषधपाणी, जेवणखावण हे रमाबाई करत होती. हे

म्हणणे खरे नाही की, भीमाबाईच्या मृत्यूपर्यंत तिची सर्व सेवा रमाबाई हिने केली. हे म्हणणे खरे आहे की, या प्रकरणात नमुद केलेल्या तिनही मिळकती संपादित झालेल्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, भीमाबाईच्या हयातीत माझी आई किंवा मावशी सीताबाई हिने अर्जात नमुद मिळकती एकत्रित कुटूंबाच्या असल्याबाबत व त्याचे हिस्से वाटणी मिळण्यासाठी कोणताही दावा दाखल केला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, प्रस्तुत अर्जाद्वारे नमुद मिळकती ह्या एकत्रित कुटूंबाच्या असल्याचे आम्ही पहिल्यांदा सांगत आहोत.

१६. हे मला माहित आहे की, न्यायालयात खोटी साक्ष दिल्यास शिक्षा होऊ शकते. हे म्हणणे खरे नाही की, निशाणी क्र.४२ वरील फेरफार मध्ये दामु नामाजी याचे मृत्यूची तारीख दिनांक ०३.०३.१९५५ अशी नमुद आहे. सदर दस्तात नमुद असलेला सर्व्हे क्र.१६६ असून त्यातील अंक ६ व मृत्यूच्या दाखल्यातील अंक ६ वेगवेगळा आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे शपथपत्रात दामु नामाजी दिनांक ०३.०३.१९५६ रोजी मयत झाल्याचे मी खोटे नमुद केले. हे म्हणणे खरे नाही की, माझे पुराव्याचे शपथपत्र लिहिताना मला १९५६ पुर्वी स्त्रीयांना वडिलांच्या मिळकतीत हिस्सा मिळत नव्हता, याची माहिती होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे जाणुन मी दामु नामाजी यांचे मृत्यूचे साल १९५६ असे नमुद केले. हे म्हणणे खरे नाही की, भीमाबाई हीच कायदेशीर वारस असल्याने दामु नामाजीच्या मृत्यूनंतर तिचे नाव सदर मिळकतीस लागले. हे म्हणणे खरे नाही की, सन १९५५ मध्ये ती मिळकत भीमाबाई हिला मिळाल्याने ती मिळकत तिची स्व मिळकत होती. हे म्हणणे खरे नाही की, मला सदर बाबींची जाणीव असल्याने मी खोटा मजकूर पुराव्याचे शपथपत्रात नमुद केला आहे.

१७. हे म्हणणे खरे आहे की, सदर प्रकरण दाखल केल्यावर रमाबाई हिने या

प्रकरणात हरकत दाखल केली आहे. मी त्या हरकतमधील मजकूर वाचला आहे. हे मला माहित नाही की, भीमाबाई हिने रमाबाई हिच्या हक्कात दिनांक २५.०६.२०१७ रोजी मृत्यूपत्र लिहून ठेवले आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या मृत्यूपत्रात संपादित झालेल्या मिळकतीचा मोबदला रमाबाई हिला मिळावा असे नमुद केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या मृत्यूपत्रासंबंधी नियमित दिवाणी दावा क्र. १३०/२०२४ आम्ही दाखल केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, न्यायालयाचा त्या मृत्यूपत्रासंबंधीचा निर्णय अजून झालेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मृत्यूपत्राने रमाबाई हिला अधिकार प्राप्त झाल्यने अर्जात नमुद मिळकतीत आम्हा अर्जदारांचा कोणताही हक्क व हिस्सा नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे आम्ही भीमाबाई हिचे कायदेशीर वारस नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी शपथपत्रातील मजकूर खोटा नमुद केला आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत

सही/-

उरण, (एस.पी. वानखडे)

दिनांक – ०४/०४/२०२६ दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, उरण